राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे ,महाराष्ट्र

# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा

## सन २०२१-२२

## गट क्र. ५ - अध्यापकाचार्य व पर्यवेक्षकीय अधिकारी

-: शीर्षक:-

# शृंखला नवचैतन्याची

सादरकर्ता


श्रीम. दीपा मिलिंद सावंत

(अधिव्याख्याता, डाएट रत्नागिरी)

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था **(DIET)**रत्नागिरी


I

# ऋणनिर्देश

प्रस्तुत नवोपक्रम सादरीकरणात नवोपक्रमकर्त्याला अनेक हातांनी मदत झाली. त्यांच्याविषयीऋण व्यक्त करणे हे नवोपक्रमकर्ता आपले आद्य कर्तव्य मानतो. त्यांच्या सहकार्यामुळेच नवोपक्रमकर्त्याला प्रस्तुत नवोपक्रम सादर करणे शक्य झाले. माझी मूळ अस्थापना जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था सिंधुदुर्ग आहे; परंतु मी सध्या उसनवार तत्त्वावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था रत्नागिरी येथे कार्यरत आहे.


या उपक्रमासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था रत्नागिरीचे प्राचार्य डॉ. गजाजन पाटील यांच्याकडून मला प्रेरणा मिळाली. तसेच श्री. सुशील शिवलकर, जेष्ठ अधिव्याख्याता व श्री. रमेश कोरे अधिव्याख्याता यांनी नवचैतन्य ग्रुपद्वारे या उपक्रमास मदत केली. डॉ. संदीप पवार, अधिव्याख्याता, श्रीम. ज्योती निंबाळकर, अधिव्याख्याता, मुनाफ गुहागरकर , विषय सहाय्यक व योगेश कदम, शिक्षक यांचे नवोपक्रम लेखन व टंकलेखनाकरिता विशेष सहकार्य मिळाले. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था रत्नागिरी या कार्यालयातील सर्व वरिष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता, विषय सहाय्यक व कर्मचारी वृंदानी नवोपक्रमास मदत केली.

नवचैतन्य ग्रुप चे सर्व सदस्य , उपक्रमात सहभागी सर्व शिक्षक, बालसुधारगृहातील सर्व विद्यार्थी , विनोद पवार (शिक्षक) , अधीक्षक श्री. वायंगणकर व बालसुधारगृहातील प्रशासन या सर्वांच्या मदतीने शृंखला नवचैतन्याची हा नवोपक्रम अविरत चालू आहे. या नवोपक्रमात माझी मुलगी श्रीनिधी व माझा मुलगा यशराज यांचाही सहभाग मोलाचा आहे.

नवोपक्रम पूर्ततेसाठी सहाय्यभूत ठरलेल्या सर्व मदतीच्या हातांचे मनस्वी आभार.

धन्यवाद!

नवोपक्रमकर्ता


श्रीम. दीपा मिलिंद सावंत

अधिव्याख्याता

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था रत्नागिरी

# अनुक्रमणिका


| अ.क्र | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | नवोपक्रमाचे शीर्षक | I |
| २ | ऋणनिर्देश | II |
| ३ | अनुक्रमणिका | III |
| ४ | प्रस्ताविक | 1 |
| ५ | नवोपक्रमाची गरज व महत्त्व | 1 |
| ६ | नवोपक्रमाची उद्दिष्टे | 2-3 |
| ७ | नवोपक्रमाचे नियोजन | 3-8 |
| ८ | नवोपक्रमाची कार्यपद्धती | 8-24 |
| ९ | नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पत्ती | 24-28 |
| 10 | समारोप | 28 |
| | संदर्भ ग्रंथ सूची व परिशिष्ट | 29-40 |

# प्रस्तावना

कोरोना आणि त्यामुळे झालेले लॉकडॉउन यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले. कोविड१९ने सर्वच क्षेत्रापुढे काही मुलभूत प्रश्न उभे केलेत. त्यात शैक्षणिक क्षेत्रही अपवाद नाही. मुलांच्या सुरक्षिततेचा विचार लक्षात घेता कोरोना कालावधीत शाळा बंद झाल्या. जगरहाटीच ठप्प झाली. हा सर्वांसाठीच पहिला अनुभव होता. समोर आलेल्या परिस्थितीची कोणी कधी कल्पना केली नव्हती. हा बदल पचविणे व अशा प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाण्याची मनस्थिती तयार होण्यास काही कालवधी लागलाच. या सर्वात अधिक बैचेन होते ते विद्यार्थी. या बिकट परिस्थितीचा परिणाम विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर होत होता.

इयत्ता १ ली ते १० वी व आय टी आय मध्ये शिक्षण घेणारी एकूण २५ मुले जिल्हा परिविक्षा आणि अनुरक्षण संघटना संचलित कै.ना.प.अभ्यंकर निरीक्षणगृह - बालगृह रत्नागिरी येथे राहतात. आई वडिलांच्या छत्राला पोरकी झालेली; तसेच गुन्हेगारी क्षेत्राशी संबंधित बालके इथे राहतात. ही सर्व मुले खूप वाईट अशा कौटुंबिक, सामाजिक व बिकट आर्थिक परिस्थितीतून आलेली असतात. निरीक्षणगृह व बालगृहात या मुलांना सरकारमार्फत सर्व सोयी सुविधा पुरविल्या जातात. त्यांना गरज असते ती फक्त प्रेमाची व आपुलकीची. अशा विद्यार्थ्यांसाठी माझ्या परीने जेवढे करता येतील तेवढे अधिकाधिक प्रयत्न मी करत आहे.

लॉकडाऊन परिस्थितीत बालसुधारगृहातील विद्यार्थ्यांच्या गरजेनुरूप नवचैतन्य ग्रुप मार्फत विविध ऑनलाइन / ऑफलाईन उपक्रम राबविण्यात आले. उपक्रमांची साखळी अजूनही चालू आहे. म्हणूनच मी सदर नवोपक्रमाचे शीर्षक शृंखला नवचैतन्याची असे दिले आहे.

## नवोपक्रमाची गरज व महत्त्व :

शाळा बंद झाली आणि पालक शिक्षकांच्या भूमिकेत आले. Online शिक्षण पद्धतीचा उगम झाला. पण अशा वेळी निरीक्षणगृह – बालगृह (रत्नागिरी) मधील विद्यार्थी कसे शिकणार असा प्रश्न मनात आला. निरीक्षण – बालगृहातील शिक्षक श्री. विनोद पवार माझा DIET मधील D.Ed.चा विद्यार्थी. कोरोना कालावधीच्या पूर्वीही मी, माझे कुटुंबीय व माझे शिक्षक मित्र-मैत्रिणी व DIET च्या माध्यमातून अनेकविध उपक्रम बालसुधारगृहात राबविले होते. ज्यामुळे विदयार्थ्यांच्या गुणवत्ता व व्यक्तिमत्त्व विकासास मदत झाली होती. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक व मी एक परिवारच होतो. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या काळजीने मी शिक्षक विनोद

पवार याला फोन केला. मुल सुरक्षित होती; पण शाळा बंद झाल्याने ती खूप अस्वस्थ झाली होती. विनोदला त्यांना सांभाळण, शिकवण यासाठी खूप कसरत करावी लागत होती. त्याची खूपच दमछाक होत होती. तो एकटा शिक्षक व २५ विद्यार्थी बाहेरील तणावपूर्ण कोरोनाचे वातावरण सर्वच भीतीच्या छायेखाली होती. फोनद्वारा ही सारी परिस्थिती ऐकून मीही अस्वस्थ झाले. काय करावे विचारचक्र सुरू झाले. कारण तेव्हा online शिक्षणही सुरु झाले नव्हते. ती रात्र अस्वस्थतेत गेली. दुसऱ्या दिवशी पुन्हा विनोदला फोन केला. त्याला विचारले smartT.V. मिळाला तर...? या कल्पनेनेच तो उल्हसित झाला आणि म्हणाला, खरच मॅडम माझे अध्ययन-अध्यपनाचे काम खूप हलके होईल. मग मनाशी ठरवल. बालसुधारगुहाला Smart TV द्यायचा. त्यासाठी पैसे हवेत. लगेचच एक मेसेज तयार केला. माझ्या अगदी जवळच्या विश्वासातील व नेहमीच मदतीस पुढे असणाऱ्या माझ्या मित्र-मैत्रिणींना पाठवला. प्रत्येकी एक हजार एक रुपये दोन दिवसात प्रत्येकांनी online पाठविले. पैसे जमा झाले. पण लॉकडाऊनमुळे दुकाने बंद रत्नागिरीतील 'महाराजा' दुकानाचे मालक यांच्याशी संपर्क केला, परिस्थितीची निकड पहाता त्यांनाही मदतीची तयारी दाखविली. पोलीस विभागाची खास परवानगी घेऊन तिसऱ्या दिवशी बालसुधारगृहात smart TV ॲक्टीव्हेट केला. हे साऱ्या फक्त चार दिवसात घडले.

smart T.V. साठी देणगी देणाऱ्यांचा नवचैतन्य ग्रुप तयार केला गेला. त्याद्वारे बाल सुधारगृहातील अध्यापनात शिक्षक मित्र सहभागी झाले. Online अध्ययन – अध्यापन सुरूदेखील झाले आणि लेखील मुलांच्या चेह-यावर हास्य फुलले. शाळा बंद असली तरी बालसुधारगृहात त्यांची दुसरी आनंददायी शाळा सुरू झाली आणि नवचैतन्यग्रुपही चा आनंदही द्विगुणित झाला.

## उद्दिष्ट्ये:

- कोरोना कालावधीत बालसुधारगृहातील विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावून सकारात्मक मानसिकता तयार करणे.
- अध्ययन - अध्यापन आनंददायी करून विद्यार्थ्यांची शिकण्याची गोडी टिकवून ठेवणे.
- विदयार्थ्यांना नवनवीन शैक्षणिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यास प्रवृत्त करणे.

- विद्यार्थ्यांच्या स्वयंअध्ययनास चालना देणे.
- विध्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यास मदत करते.
- बालसुधारगृहातील विद्यार्थी व समाज आंतरक्रिया वृद्धींगत करणे.

## उपक्रम नियोजन:

### उपक्रम पूर्वस्थितीचे निरीक्षण -

कोरोना विषाणू प्रादुर्भावाने जगरहाटीच थांबली. सुरक्षिततेसाठी सारीच माणसं घराघरात बंद झाली. शाळाही बंद झाल्या. अशा परिस्थितीत बालसुधारगृहातील मुले सुधारगृहाच्या भिंतीत कैद झाली. एक शिक्षक आणि वेगवेगळया वर्गातील 25 विद्यार्थी. शिक्षक श्री. विनोद पवार समोर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले, मुले दिवसभर संभाळणे, त्यांना शिकविणे, त्यांच्या आरोग्याची काळजी असे नाना प्रश्न.

विनोद माझा DIET, Ratnagiri D.ed चा विदयार्थी. एक उपक्रमशील शिक्षक. त्याच्यामुळे मी बालसुधारगृहाशी जोडले गेले. त्याचा मला फोन आला. काय करावे मॅडम! ...आणि माझे विचारचक्र सुरू झाले.

संबंधित व्यक्तींशी / तज्ञांशी चर्चा

कोरोना कालावधीत बालसुधारगृहातील मुलांच्या अध्ययन अध्यापनासाठी काय करता येईल. कारण प्रत्यक्ष तिथे जाणे शक्य नाही. या विषयी मी शिक्षक विनोद पवार यांच्याशी चर्चा केली. Smart TV मिळाला तर हा प्रश्न सुटेल, असे चर्चेअंती ठरले. मात्र Smart TV विकत घ्यायचा म्हणजे पैसे हवेत. मी पूर्वाश्रमीची शिक्षिका. त्यामुळे अनेक शिक्षक - शिक्षिकांशी माझे मैत्रीचे संबंध! त्यापैकी २२ जणांशी मेसेज करून संपर्क केला. बालसुधारगृहातील विदयार्थ्यांना smart TV द्यायचा आहे. आपण १०००/- रु ची मदत करावी. दुसऱ्या दिवशीच पुरेशी रक्कम जमा झाली.

आवश्यक साधनांचा वापर

बालसुधारगृहातील विदयार्थ्यांना smart T.V. लॉकडाऊन कालावधीतही रत्नागिरीतील महाराजा या दुकानमालकांनी उपलब्ध करून दिला. पण अध्ययन-अध्यापनासाठी e-learning software आवश्यक होते. त्यासाठी श्रीम. काणे मॅडम साधनव्यक्ती, रत्नागिरी यांची मुलगी मैत्रेयी हिने पुण्याला प्रसाद जोशी व महेश पवार यांच्याशी संपर्क साधून e-learning software बालसुधारग्रहातील मुलांसाठी उपलब्ध करून दिले. ज्याची किंमत ४५ हजार रुपये आहे. परंतु त्यांनी बालसुधारग्रहातीलमुलांसाठी ते मोफत उपलब्ध करून दिले.

करावयाच्या कृतींचा क्रम

१) नवोपक्रम संदर्भात बालसुधारगृहातील शिक्षक श्री. विनोद पवार व काही विद्यार्थ्यांशी फोनद्वारे चर्चा केली.

२) पूर्वस्थितीचे निरीक्षण केले.

३) नवोपक्रमांची गरज समजून घेतली.

४) सहकार्यासाठी शिक्षक, अधिकारी, मित्र-मैत्रिणीशी चर्चा केली. निधी जमा केला.

५) विद्यार्थ्यांची पूर्व अध्ययन स्तर निश्चिती केली.

६ ) लॉकडाऊन कालावधीलही smart T.V. बालसुधारग्रहातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिला.

७) E-learning software उपलब्ध करून दिले.

८) विविध उपक्रम online/offline यांचे नियोजन केले.

९) बालसुधारगृहातील विद्यार्थ्यांशी भेट व चर्चा

१० ) प्रत्यक्ष उपक्रमांची अंमलबजावणी केली.

११ ) विद्यार्थ्यांची पश्चात अध्ययन स्तर निश्चिती केली.

१२) नवोपक्रम अहवाल लेखन केले.

## उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण:

सन 2020-21 व सन 2021-22 या कालावधीत सदर उपक्रम राबविला. लॉकडाऊन कालावधीतील या उपक्रमामुळे बालसुधारगृहातील मुलांची शाळा तिथेच सुरू झाली. विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकासास पूरक गुणवत्ता वाढीसाठी online शिक्षण उपयुक्त ठरले.

'सर्वात महत्त्वाचे लॉकडाऊन कालावधीत मुले आनंदी, उत्साही व आरोग्यसंपन्न राहिली. भीतीच्या छायेपासून दूर राहिली. शाळा बंद असूनही अध्ययन अध्यापन प्रक्रिया आनंददायी सुरु राहिली. इयत्ता १० वी चा निकाल खूप चांगला लागला.

### कार्यवाहीचे टप्पे: (वेळापत्रक)

| अ.क्र. | कार्यवाहीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | नवोपक्रम निश्चिती | ०६/०४/२०२० |
| २ | शिक्षक व मित्र-मैत्रिणींशी चर्चा | ०६/०४/२०२० ते ०७/०४/२०२० |
| ३ | साधनांची उपलब्धता | ०८/०४/२०२०<br>२२/०४/२०२०<br>०३/०५/२०२०<br>१५/०९/२०२१ |
| ४ | नवचैतन्य ग्रुपनिर्मिती | २०/०४/२०२० |
| ५ | अध्ययन स्तर निश्चिती | ०७/०४/२०२० |
| ६ | विविध उपक्रमनिर्मिती व अंमलबजावणी | ०८/०४/२०२० ते |

| | | |
|---|---|---|
| | | ०१/११/२०२१ |
| ७ | उपक्रमोत्तर निरीक्षण व(विद्यार्थी भेट व चर्चा) | १६/०९/२०२१ |
| ८ | अध्ययन स्तर निश्चिती | १०/०९/२०२१ |
| ९ | अहवाल लेखन | १८/११/२०२१ ते २२/११/२०२१ |

उपक्रमासाठी इतरांची मदत:

शिक्षक : अधिकारी, मित्र-मैत्रिणींच्या, माझ्या मुलांच्या सहकार्याने सदरउपक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी  करणे शक्य झाले. बालसुधारगृहरातील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक साधनसामुग्रीसाठी देणगी रूपात रक्कम एका दिवसात जमा झाली. DIET रत्नागिरीत जेष्ठ अधिव्याख्याता श्री. सुशील शिवलकर व अधिव्याख्याता श्री. रमेश कोरे यांचे सहकार्य लाभले. बालसुधारगृहातील शिक्षक श्री. विनोद पवार व अधिक्षक श्री. वायंगणकर सर  यांचे या उपक्रमासाठी सर्वात मोठे सहकार्य मिळाले.

नवचैतन्य ग्रुपमधील शिक्षकांनी बहुमूल्य सहकार्य केले.  डाएट प्राचार्य डॉ. गजानन पाटील सर यांची या उपक्रमासाठी प्रेरणा मिळाली; तसेच डाएट परिवारातील सर्व अधिकारी, विषय सहाय्यक यांची साथ मिळाली. श्री. सचिन सारोळकर, मानसोपचार तज्ञ ( समावेशित शिक्षण) यांनी टॅब उपलब्ध करून दिला. श्रीम अश्विनी काणे व त्यांची मुलगी मैत्रेयी यांनी e - learning software उपलब्ध करून दिले.

नवचैतन्य ग्रुपमध्ये नसलेलेही काही शिक्षक-शिक्षिका यांनी पुढील विविध उपक्रमात सहभागी होऊन उपक्रम यशस्वीतेसाठी मदत केली.

उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे,

१) नवचैतन्य ग्रुपनिर्मिती. T.V. उपलब्धता,

२) Smart TV उपलब्धता,

३) विविध उपक्रम फोटो,

४) शाळा बंद शिक्षण सुरू उपक्रम,

५) अध्ययन स्तर निश्चिती (पूर्वस्थिती )

६) अध्ययन स्तर निश्चिती(उपक्रमपश्चात).

७) सहभागी शिक्षक, मान्यवर मनोगते.

८) बालसुधारगृहातील शिक्षक, अधिक्षक मनोगते.

९) मान्यवरांचे अभिप्राय

## नवोपक्रमाची कार्यपद्धती :

## उपक्रम पूर्वस्थितीची निरीक्षणे व नोंदी -

कोरोना आणि लॉकडाऊनमुळे शाळा बंद झाल्या. सारं जगच ठप्प झाले. सर्वसामान्य मुले आपपल्या घरात, आई, बोबा, बहीण भाऊ, आजी-आजोबा यांच्या सोबत घरी अडकली. त्यांना मायेची छाया तरी होती. पण शाळा बंद झाल्यावर बालसुधारगृहातील मुलांची वेगळीच घुसमट सुरू झाली. आई, वडिलांना पारखी झालेली ही मुले दिवस-रात्र बालसुधारगृहात बंद झाल्याने उदास, खिन्न झाली.

शिक्षक विनोद पवार या मुलांसाठी जीवतोड प्रयत्न करीत होता. अध्यापन करीत होता. उपक्रम घेत होता. त्याची दमछाक होत होती व मुलांचाही तेवढा सकारात्मक प्रतिसाद नव्हता. विदयार्थ्यांना कोरोनापासून सुरक्षित ठेवणे, त्यांचा अभ्यास घेणे व त्यांना आनंदी ठेवणं यासाठी त्याची तारेवरची कसरत चालू होती. शाळा बंद असल्याने विद्यार्थी अभ्यासाकडे दुर्लक्ष करीत होते. कोरोनामुळे तेही घाबरलेले होते, भीतीच्या छायेत वावरत होते. या सर्वामुळे बालसुधारगृहाचे प्रशासन चिंतेत होते.

# कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व त्यांच्या नोंदी

## उपक्रमांची अंमलबजावणी

उपक्रम १) SMART TV भेट (दि.०८.०४.२०२०)

कोरोना कालावधीत विद्यार्थ्यांचे अध्ययन-अध्यापन सुरू राहावे यासाठी मित्रपरिवाराच्या सहकार्याने बालसुधारगृहातील विद्यार्थ्यांसाठी रोख रक्कम जमा केली व त्यातून २३ हजार रुपयांचा Smart .T.V. भेट म्हणून विदयार्थ्यांना दिला.

फलनिष्पत्ती:

१) विद्यार्थी आनंदित झाले.
२) शिक्षक विनोद पवार यांच्यावरील अध्यापनाचा ताण कमी झाला.
३) शाळा बंद तरीही शिक्षण सुरु झाले.

उपक्रम २-

पेनड्राईव्ह भेट (दि.२२.०४०२०२०)

Smart TV चा वापर अधिकाधिक सुकर व जास्त प्रमाणात होण्यासाठी दोन पेन ड्राईव्ह (१५०० रु ) दिले. ज्यामध्ये विविध शैक्षणिक उपक्रम अध्ययन-अध्यापनपूरक व्हिडीओ इ.भरून शिक्षक श्री. विनोद पवार यांना देण्यात आले.

फलनिष्पत्ती:

१) अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक आनंददायी झाली.
२) वरच्या वर्गातील विद्यार्थी शिक्षक भूमिकेतून सुलभकाचे काम करू लागले व लहान मुलांना अध्यापन करू लागले.
३) विद्यार्थ्यांच्या मनावरील कोरोनाच्या भीतीचे थोडे कमी झाले.

उपक्रम ३ -

नवचैतन्य ग्रुपची स्थापना (दि.२०.०४.२०२०)

बालसुधारगृहातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करणाऱ्या शिक्षक व अधिकाऱ्यांचा एक whatsapp ग्रुप तयार केला. त्याचे नामकरण नवचैतन्य असे करण्यात आले. या उपक्रमात नवचैतन्य ग्रुपचे सहकार्य, मार्गदर्शन मैलाचा दगड ठरला. समोरासमोर भेटता येत नसल्याने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी हा दुवा फार महत्त्वाचा ठरला. या ग्रुपमधील प्रत्येक सदस्य अगदी अंतकरणापासून या विद्यार्थ्यांशी जोडला गेला आणि आपापल्या परीने विद्यार्थी अध्ययन - अध्यापन सुकर व्हावे यासाठी झटू लागला. शिक्षक विनोद सरांना या ग्रुपद्वारे अनमोल असे मार्गदर्शन मिळाले. त्यामुळे त्यांना ऑनलाइन अध्ययन अध्यापन करणे सुकर झाले.

या ग्रुपद्वारे घेतले गेलेले उपक्रम

१) स्वानुभव : बालसुधारगृहातील शिक्षक श्री. विनोद पवार यांनी त्यांच्या सेवेतील विविध अनुभव शब्दबद्ध कले होते. त्या लेखांची शृंखला ते ग्रुपवर पाठवत. ज्यामुळे ग्रुपमधील इतर सर्व सदस्यांना बालसुधारगृहातील विद्यार्थ्यांच्या समस्या, संकटे, अडचणी, त्याचे वर्तन, त्यामागील कारणे समजली. तिथे शिक्षक म्हणून काम करणे किती जबाबदारी व आव्हानात्मक आहे, याची जाणीव झाली. ही लेख शृंखला आजही चालू आहे.

२) Online पद्धतीचा वापर : अध्ययन - अध्यापन तंत्र नियम माहिती एकूण भाग ४ – प्राची साठे

३) हस्ताक्षर -Youtube. – श्री.काणे अश्विनी

४) zp Ratnagiri live Education

५) scert पूरक शैक्षणिक दिनदर्शिका

६) ज्ञानप्रोबोधिनी इ.१ली ते १०वी अभ्यासक्रम चित्रफिती

७) शाळा बंद शिक्षण आहे.

८) अभ्यासमाला २.०

९) गोष्टींचा शनिवार

१०) miscall द्या गोष्टी ऐका

११) स्वाध्याय

१२) शिकू आनंदे

१३) सेतू अभ्यासक्रम

१४) कथासरीता

१५) करीअर मार्गदर्शन

१६) मैत्री करू विज्ञानाशी

SCERT पुणे मार्फत राबविण्यात आलेल्या सर्वच online उपक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात नवचैतन्य ग्रुपमधील सदस्य व विनोद पवार यांनी मेहनत घेतली.

उपक्रम-४

E-learning software (०३.०५.२०२०)

बालसुधारगृहातील विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापनासाठी e-learning software, (इ१ते७वी) नवचैतन्य ग्रुपमधील एक सदस्या श्रीम. अश्विनी काणे (साधन व्यक्ती रत्नागिरी) व त्यांची मुलगी मैत्रेयी काणे हिने प्रयत्न केले –बालसुधारगृहातील मुलांसाठी सदर Software मोफत मिळवून दिले.

फलनिष्पत्ती

१) अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक सुलभ व आनंदायी झाली.

२) विद्यार्थी तंत्रस्नेही होण्यास मदत झाली.

३) Each on teach one पद्धत्ती ने अध्ययन अध्यापनास सुरुवात झाली.

४) विध्यार्थी स्वयंअध्ययनास गती मिळाली.

५) गट अध्ययनास चालना मिळाली.

६) विद्यार्थ्यांनी शिक्षक/ सुलभक / मार्गदर्शकाच्या भूमिकेतही काम केले.

उपक्रम- ५

परसात फुलवू भाजीपाला

कालावधी- दि. १५.०५.२०२० ते आज पर्यंत चालू -

अभ्यासासोबत विद्यार्थ्यांना श्रमप्रतिष्ठा समजावी व रिकाम्या वेळेचा सदुपयोग करता यावा यासाठी बालसुधारगृहातील आवारात विदयार्थी, शिक्षक यांच्या मदतीने भाजीपाला व फुलझाडे फुलविण्यात आली. मला स्वतःला बागकामाची आवड असल्याने मी थोडेफार मार्गदर्शन केले.

फलनिष्पती -

१) विद्यार्थी आनंदाने या उपक्रमात सहभागी होऊन झाडे, भाजीपाला यांची काळजी घेऊ लागले.

२) मोकळे आवार फुलझाडे व भाजीपालाने भरून गेले.

३) भाजीपाल्याचा (पालेभाजी, टमेटो, वांगी, पालक, मेथी, मिरची, कोथिंबीर) वापर दैनंदिन आहारात करण्यात आला.

४) श्रमप्रतिष्ठा मूल्य रुजण्यास मदत झाली.

५) कोरोनाच्या भीतीदायक वातावरणातून मुले बाहेर पडली.

उपक्रम-६

'चला करू मातकाम' (दि. २०.०८.२०)

विद्यार्थ्यांनी विनोद पवार सरांच्या मदतीने मातीच्या विविध वस्तू बनविल्या. त्या रंगविल्या. मातकामाच्या उपक्रमाने मुले उल्हासित झाली. मातकामात प्रवीण असलेल्या काही विद्यार्थ्यांनी आपल्या सहकारी मित्रांना मातकाम करण्यास मदत / मार्गदर्शन केले.

उपक्रम ७

कचऱ्यातून कला (दि. २०.०८.२०)

नारळाच्या झाडाच्या झावळयापासून "चटई बनविण्याचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. निवडक विद्यार्थ्यांनी त्यापासून चटई बनविली. उत्पादक कार्यानुभवाशी या उपक्रमाची सांगड घालण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला यातून वाव मिळाला.

उपक्रम ८

शिकूया चित्रकला (कार्यशाळा दि. १८.०९.२०२० )

अभ्यासासोबत इतरही क्षेत्रात, कलाक्षेत्रात विदयार्थ्यांनी यश प्राप्त करावे, यासाठी दि.१९.०९.२०२० रोजी अधीक्षक वायगंणकर सर व विनोद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली चित्रकला कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. त्यासाठी लागणारे कागद, रंग पेटी, बॉटर कलर पेन्सल, स्केच पेन हे जवळजवळ ५००/- रु. चे साहित्य नवचैतन्य ग्रुपतर्फे देण्यात आले.

चित्रकला स्पर्धा (दि. २५.०९.२०२०)

कार्यशाळेची यशस्वीता तपासून पहाण्यास सात दिवसाच्या विदयार्थ्यांच्या सरावानंतर २५.०९.२०२० रोजी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करून त्यातील यशस्वी स्पर्धक ठरविण्यात आले. नवचैतन्य ग्रुपतर्फे बक्षीस समारंभ नियोजित आहे. (कोरोना पार्श्वभूमीवर अजून जास्त सदस्यांना बालसुधारगृहात प्रवेश नाही) उपक्रमासाठी मला मात्र 'करोना प्रादुभाव कमी झाल्यावर बालसुधारगृहात प्रवेशकरण्याची विशेष परवानगी मिळाली. (नियम पाळून) त्यामुळे उपक्रम घेणे सोईचे झाले.

फलनिष्पत्ती :

१) चित्रकलेसाठी आवश्यक साधन सामग्री मिळाल्यामुळे मुले कार्यशाळेत/ स्पर्धेत उत्साहाने सहभागी झाले.

२) विदयार्थ्यांच्या कलागुणास वाव मिळाला.

३) कोरोना आजाराविषयीचा मनावरील ताण कमी झाला.

उपक्रम ९

मोटीव्हेशन व्हिडीओ (कालावधी दि. ०१.११.२०२० ते दि. २०.०२.२०२०)

अभ्यासासोबत विदयार्थ्याचा सर्वांगिण विकास व्हावा, आपण जरी आईबाबाना पारखे झालो आहोत, बालसुधारगृहात शिकतोय, तरीही भविष्यात आपणही कोणी मोठी व्यक्ती, यशस्वी माणूस बनू शकतो ही जाणीव निर्माण करणे व त्यांच्यामधील आत्मप्रेरणा जागृत करणे या दृष्टीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यामधील व्हिडीओ दाखविण्यांत आले.

१) जोश टॉक

२) विश्वास नागरे-पाटील

३) मुनिबामातारी

४) ध्रुव राठी

५) सैदिप महेश्वरी

६) उद्योजक राम दासमाने

७) फॅशन फोटोग्राफर – संजीव साळवी

फलनिष्पत्ती:

१) विद्यार्थ्यांमध्ये आपणही आपण कोणत्याही क्षेत्रात चांगले काही करू शकतो – ही भावना निर्माण झाली.

२) विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली.

३) आपण पोरके आहोत, बालसुधारगृहात रहातो याविषयीची उदासीनता दूर झाली.

उपक्रम-१०

माघी गणेशोत्सव

विद्यार्थ्यांनी अधीक्षक आणि शिक्षकांच्या मदतीने गणपतीची मूर्ती बनविली. पूजा, आरती, स्तोतपठण, नैवेद्य या साऱ्यामुळे एक भक्तिमय आणि आनंददायी वातावरण निर्मिती झाली. बालसुधारगृहात उत्साहाचे वातावरण झाले.

उपक्रम-११

फनी गेम्स - (दि. ३०.११.२०२०)

अध्ययन-अध्यापन प्रक्रियेबरोबर विध्यार्थ्यांना आनंद मिळावा, या हेतूने बालसुधारगृहात फनी गेम्सचे आयोजन करण्यात आले. यामध्ये, संगीतखुर्ची, चमचागोटी, बादलीतील वाटीत नाणे टाकणे, मेणबत्ती पेटविणे, गाढवाला शेपूट काढणे यांसारख्या अनेक खेळांचे आयोजन केले होते. त्या दिवशी सर्व मुलांनी खेळाचा मनमुराद आनंद लुटला.

उपक्रम१२

Group Reading (श्यामची आई) (दि. १५.०१.२०२० ते दि. ३०.०५.२०२०)

Online शिक्षणामुळे मुले वाचनाचा कंटाळा करीत आहेत, असे विनोद पवारशी झालेल्या चर्चेत लक्षात आले. त्यातून या उपक्रमाची कल्पना सुचली. विदयार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी व्हायचेच, अशी अट ठेवण्यात आली. प्रथमतः उपक्रमात सहभागी होताना अनुत्साही असणारी मुले उपक्रम जसजसा पुढे सरकला तसतशी उत्साहाने सहभागी होऊ लागली. दुसऱ्या दिवशी जो पुस्तकातील भाग आपणास वाचन करायचा आहे त्याचा आदल्या दिवशी सराव करू लागली. सर्वांचा उत्तम सहभाग या उपक्रमास लाभला.

फलनिष्पत्ती :

१) विदयार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण झाली.

२) विदयार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

३) Group Reading ची सवय झाली.

उपक्रम१३

ऐकूयात चरित्र छत्रपती संभाजी महाराजाचे (दि.२०.१२.२० ते दि. २९.१२.२०२०)

विदयार्थ्यांना गोष्टी ऐकायला खूप आवडतात. श्री. सुशील जाधव (प्राथमिक शिक्षक लांजा, रत्नागिरी यांचे कथाकथन मी ऐकले होते. त्यांना विनंती करताच ते online कशाकथनासाठी लगेच तयार झाले. खरंतर एकाच भागात ते संभाजी महाराजांविषयी कथाकथन करणार होते; पण २०.१२.२०२० रोजी पहिला कार्यक्रम संपल्यावर त्यांनी मुलांशी मनसोक्त गप्पा मारल्या. तेव्हा उर्वरीत संभाजी चरित्र सांगण्याची विद्यार्थ्यांनी विनंती केली. जाधव सरांनी लगेच संमती दर्शवली व दि. २०.१२.२०२० रोजी दुसऱ्या भागात त्यांनी संभाजी महाराजांचे उर्वरीत चरीत्र आपल्या ओघवत्या भाषेत सादर केले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग मिळाला.

फलनिष्पती:

१) विद्यार्थ्यांना संभाजी महाराज संपूर्ण जीवनकाल समजला.
२) विद्यार्थ्यांची श्रवणशक्ती वाढली.
३) आपला इतिहास, ऐतिहासिक परंपरा याविषयी अभिमान निर्माण झाला.
४) देशभक्ती वृद्धिंगत होण्यास मदत झाली.

उपक्रम – १४

कौन बनेगा करोडपती माझा प्रवास (दि.१०/०१/२०२१)

श्रीम. भावना वाघेला (दि.१०.०१.२०२१) रत्नागिरीतील नगर परिषद शाळेमधील

शिक्षिका यानी कौन बनेगा करोडपती या प्रथमंजूषा कार्यक्रमात 50,00,000 रक्कमेने विजयी होणाऱ्या श्रीम. भावना वाघेला मॅडम यांचा अनुभवकथन कार्यक्रम संपन्न (Online) झाला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी त्यांची मुलाखत घेतली. त्यांना अनेक प्रश्न विचारले. हा सर्व प्रवास जाणून घेण्यास विद्यार्थी खूपच उत्सुक दिसले . मॅडमही त्या विद्यार्थ्यांमध्ये रममाण झाल्या.

उपक्रम -१५

निरीक्षण गृहातील बालकाना मार्गदर्शन व समुपदेशन

मा. संचालक SCERT Pune मार्फत निरीक्षणगृहातील बालकांना मार्गदर्शन व समुदशेन सेवा मिळण्याच्या दृष्टीने संबंधित पत्र कार्यालयात प्राप्त झाले. पण त्या यादीमध्ये रत्नागिरीतील बालसुधारगृहाचे नाव नव्हते. सदर विद्यार्थी या मार्गदर्शनापासून वंचित राहू नयेत, अशी माझी तळमळ. डायटचे प्राचार्य डॉ. गजानन पाटील यांच्या विशेष परवानगीने सदर उपक्रम रत्नागिरीतील बालसुधारगृहात राबविण्यात आला. यामध्ये समता विभाग प्रमुख डॉ. संदीप पवार आणि सर्व विषय सहाय्यकांचे भरीव सहकार्य मिळाले. तो पर्यन्त कोरोना प्रादुर्भाव कमी झाल्याने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करता आले.

उपक्रम नियोजन

| अ.क्र | दिनांक | घ्यावयाचेउपक्रम | तज्ञ मार्गदर्शक | मार्गदर्शक अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | ३०/०३/२०२१ | दीक्षा app मार्गदर्शन | मुनाफ गुहागरकर | दीपा सावंत |
| २ | ३१/०३/२०२१ | जीवन कौशल्य | बसवेश्वर कल्याणकस्तुरे | दीपा सावंत |
| ३ | ०१/०४/२०२१ | विद्यार्थी समुपदेशन | सचिन यादव | दीपा सावंत |
| ४ | २०/०९/२०२१ | अध्ययन स्तर निश्चिती | दीपा सावंत | दीपा सावंत |

फलनिष्पत्ती-

१) खूप कालावधीनंतर Online ऐवजी प्रत्यक्ष मार्गदर्शन /उपक्रम घेतल्याने मुले खूप आनंदी झाली.

२) विद्यार्थी व शिक्षकांना दीक्षा ॲप वापरण्याबाबत योग्य मार्गदर्शन मिळाले.

३) विद्यार्थ्यांनी जीवन कौशल्य आत्मसात करणेबाबत मदत, मार्गदर्शन केले गेले.

४) विद्यार्थी समुपदेशन करण्यात आल्याने विद्यार्थी मनमोकळेपणाने व्यक्त झाली.

५) शिष्यवृत्ती मार्गदर्शनाचा फायदा विदयार्थ्यांना झाला.

६) विषय सहाय्यक व बालसुधारगृहातील विद्यार्थी यातील आंतरक्रिया वृद्धिंगत झाली.

उपक्रम १६

टॅब माझ्या हाती (दि.१५.०९.२०२१ )

Online शिक्षणात Smart TV व मोबाईलची मर्यादा पहाता विद्यार्थ्यांसाठी टॅब आवश्यक होता. जिल्हा मानसशास्त्रज्ञ श्री. सचिन सारोळकर यांच्याशी मी चर्चा करताच त्यांनी लगेचच १ टॅब विदयार्थ्यांसाठी स्वतः दिला. अजूनही पाचजण टॅब द्यायला तयार झाले आहेत. लवकरच ते विध्यार्थ्यांना प्राप्त होतील, त्यादृष्टीने माझे प्रयत्न चालू आहेत.

उपक्रम१७

चला बनवू किल्ला (दि.०१/११/२०२१)

दिवाळीचे औचित्य साधून विदयार्थ्यांनी शिवकालीन किल्ला बालसुधारगृहाच्या प्रांगणात बनविला व दीपावलीचा आनंद द्विगुणीत केला.

iii) उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्यांच्या नोंदी

उपक्रमपूर्व आणि उपक्रम पश्चात विद्यार्थ्यांची अध्ययन स्तर निश्चिती करण्यात आली होती. पूर्व व अध्ययन स्तर निश्चितीमध्ये विदयार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ झाल्याचे दिसून आले.

विद्यार्थी कोरोनो कालावधीत बालसुधारगृहात बंदिस्त झाल्याने कंटाळलेले, भयभीत झाले होते. उपक्रम पश्चात सर्व विद्यार्थी उत्साही वाटले. विद्यार्थीना online शिक्षणाची गोडी निर्माण झाली. शाळा बंद झाली तरी विदयार्थ्यांचे शिक्षण सुरू राहिले. बालसुधारगृहातील शिक्षक श्री.विनोद पवार व अधीक्षक श्री.वायंगणकर यांच्यावरील ताण कमी झाल्याचे दिसून आले.


कार्यवाही करताना आलेल्या अडचणी

खरं पहाता बालसुधारगृहातील मुलांसाठी आपण काही तरी करुयाही कल्पना मी नवचैतन्य ग्रुपमधील माझ्या मित्र-मैत्रिणींना सांगितली, तेव्हा Smart TV साठीचा आवश्यक निधी एका दिवसात जमा झाला. खरी अडचण होती लॉकडाऊनमध्ये Smart TV उपलब्ध कसा करून द्यायचा. कारण सर्व दुकाने बंद होती. महाराजा' दुकानाचे मालक घोसाळकर यांच्याशी फोन संपर्क केल्यावर माझी तळमळ व धडपड पाहून ते लगेच तयार झाले. गोडाऊन उघडण्याची व Smart T.V. बालसुधारगृहात बसविण्यासाठीची विशेष पोलीस परवानगी काढून बालसुधारगृहात smart T.V. दोन दिवसांत बसविला. यासाठी बालसुधारगृहातील प्रशासनाचेही मोलाचे सहकार्य मिळाले.

दुसरी किरकोळ अडचण online कार्यक्रमात कधीकधी रेंज येत होती. इतर कोणत्याच अडचणी उपक्रम दरम्यान आल्या नाहीत. नवचैतन्य ग्रुपमधील सदस्यासोबत नंतर अजूनही काही शिक्षक मित्र-मैत्रिणी या उपक्रमात सामिल झाल्या या सर्वाच्या सहकार्याने उपक्रम पूर्णत्वास गेला व ही उपक्रम साखळी आजतागायत चालूच आहे.

# माहितीचे विश्लेषण आलेख तकते

पूर्व –अध्ययनसत्र निश्चिती तक्ते,आलेख




जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET), रत्नागिरी

बालसुधारगृह/ निरीक्षणगृहातील विद्यार्थ्यांची अध्ययन स्तर निश्चिती

तालुका: रत्नागिरी इयत्ता: १ली ते ७वी दिनांक: ०१/०१/२० (पूर्व)

| अ.नं. | विद्यार्थ्याचे नांव | इयत्ता | शाळा | विषय: भाषा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रारंभिक स्तर | अक्षर स्तर | शब्द स्तर | वाचन स्तर |
| १ | श्रावण नारकर | १ली | र.न.प. शाळा क्र.१२ | ✓ | | | |
| २ | संभव काणेकर | २री | —॥— | ✓ | | | |
| ३ | संदेश पाटे | ३री | —॥— | | ✓ | | |
| ४ | वरुन सावंत | ३री | —॥— | | | ✓ | |
| ५ | आयुष हातणकर | ३री | —॥— | | | ✓ | |
| ६ | प्रणित जोशी | ३री | —॥— | | ✓ | | |
| ७ | समर्थ काणेकर | ४थी | —॥— | | | ✓ | |
| ८ | अर्थव गुरव | ४थी | —॥— | | | ✓ | |
| ९ | मनिष धाग | ४थी | —॥— | | | | ✓ |
| १० | आयुष मुळूख | ५वी | देसाई हायस्कूल | | | | ✓ |
| ११ | विनायक भंडवकर | ६वी | देसाई हायस्कूल | | | | ✓ |
| १२ | मंथन धाग | ७वी | देसाई हायस्कूल | | | | ✓ |

स्वाक्षरी सौरीपर्मीत
अधिव्याख्याता डायट रत्नागिरी



जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET), रत्नागिरी

बालसुधारगृह/ निरीक्षणगृहातील विद्यार्थ्यांची अध्ययन स्तर निश्चिती


तालुका: रत्नागिरी इयत्ता: १ली ते ७वी दिनांक: १०।०१।२१ (पश्चात)


| अ.नं. | विद्यार्थ्याचे नांव | इयत्ता | शाळा | विषय: भाषा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रारंभिक स्तर | अक्षर स्तर | शब्द स्तर | वाचन स्तर |
| १ | श्रावण नारकर | १ली | र.न.प. शाळा क्र.१२ | | ✓ | | |
| २ | संभव काणेकर | २री | —"— | | | ✓ | |
| ३ | संदेश वाघे | ३री | —"— | | | | ✓ |
| ४ | वरुण साळवी | ३री | —"— | | | | ✓ |
| ५ | आयुष हातणकर | ३री | —"— | | | | ✓ |
| ६ | प्रतिश जोशी | ३री | —"— | | | | ✓ |
| ७ | समर्थ काणेकर | ४थी | —"— | | | | ✓ |
| ८ | अथर्व गुरव | ४थी | —"— | | | | ✓ |
| ९ | मनिष धाग | ४थी | —"— | | | | ✓ |
| १० | आयुष मुल्लेरव | ६वी | देसाई हायस्कुल | | | | ✓ |
| ११ | विनायक मांडवकर | ६वी | देसाई हायस्कुल | | | | ✓ |
| १२ | मंथन धागे | ५वी | देसाई हायस्कुल | | | | ✓ |

स्वाक्षरी [illegible]

अधिव्याख्याता डाएट र[illegible]







जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET), रत्नागिरी

बालसुधारगृह/ निरीक्षणगृहातील विद्यार्थ्यांची अध्ययन स्तर निश्चिती


तालुका: रत्नागिरी इयत्ता: १ली ते ८वी दिनांक: ७।१।२०(पूर्व)

| अ.नं. | विद्यार्थ्याचे नांव | इयत्ता | शाळा | विषय: गणित | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | संख्याज्ञान | बेरीज | वजाबाकी | गुणाकार | भागाकार |
| १ | श्रावण नारकर | १ली | र.न.प.शाळा क्र.१२ | ✓ | [illegible] | | | |
| २ | संभव काणेकर | २री | —"— | | ✓ | | | |
| ३ | संदेश चाळे | ३री | —"— | ✓ | | | | |
| ४ | वरुन साळवी | ३री | —"— | | ✓ | | | |
| ५ | आयुष हातणकर | ३री | —"— | | ✓ | | | |
| ६ | प्रतिश जोशी | ३री | —"— | | | ✓ | | |
| | समर्थ काणेकर | ४थी | —"— | | | ✓ | | |
| | अथर्व गुरव | ४थी | —"— | | | ✓ | | |
| | मनिष धाग | ४थी | —"— | | | | ✓ | |
| | आयुष मुळूख | ५वी | देसाई हायस्कूल | | | | ✓ | |
| | विनायक मांडवकर | ६वी | देसाई हायस्कूल | | | | ✓ | |
| | चेतन धागा | ८वी | देसाई हायस्कूल | | | | ✓ | |

स्वाक्षरी [illegible]

अधिव्याख्याता डायट र

SHOT ON MI A2
MI DUAL CAMERA



जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET), रत्नागिरी


बालसुधारगृह/ निरीक्षणगृहातील विद्यार्थ्यांची अध्ययन स्तर निश्चिती

तालुका: इयत्ता: दिनांक: १०।१।२१ (२(पश्चात)

| अ.नं. | विद्यार्थ्यांचे नांव | इयत्ता | शाळा | विषय: गणित संख्याज्ञान | बेरीज | वजाबाकी | गुणाकार | भागाकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्रावण नारकर | १ली | र.न.प.शाळा क्र.१२ | | ✓ | | | |
| २ | संभव काणेकर | २री | —"— | | | ✓ | | |
| ३ | संदेश पाण्टे | ३री | —"— | | ✓ | | | |
| ४ | वरुन साळवी | ३री | —"— | | | ✓ | | |
| ५ | आयुष हातणकर | ३री | —"— | | | ✓ | | |
| | प्रतिश जोशी | ३री | —"— | | | ✓ | | |
| | समर्थ काणेकर | ४थी | —"— | | | | ✓ | |
| | अर्थव गुरव | ४थी | —"— | | | | ✓ | |
| | मनिष घाग | ४थी | —"— | | | | ✓ | |
| | आयुष मुळुरवे | ५वी | देसाई हायस्कूल | | | | | ✓ |
| | विनायक मांडवकर | ६वी | देसाई हायस्कूल | | | | ✓ | |
| | मंथन घाग | ८वी | देसाई हायस्कूल | | | | | ✓ |

स्वाक्षरी





बालसुधारगृहातील मुलांची पूर्व अध्ययन निष्पत्ती व उत्तर अध्ययन निष्पत्ती यामध्ये सकारात्मक फरक दिसून आला. गणितापेक्षा भाषेतील अध्ययन स्तराचा आलेख हा अधिक चढता आहे असे दिसून आले.

## नवोपक्रमाची यशस्विता, फलनिष्पत्ती

खरं पहाता  नवोपक्रम म्हणून मी या उपक्रमाचे नियोजन केले नव्हते. बालसुधारगृहातील विद्यार्थ्यांसाठी कोरोना कालावधीत कशाकशाची गरज आहे, हे जसेजसे लक्षात आले तसतसे उपक्रम/ मार्गदर्शनाचे नियोजन केले गेले. अजूनही हा उपक्रम संपलेला नाही. नवचैतन्य ग्रुपमार्फत या पुढेही विद्यार्थ्यासाठी अनेक उपक्रम/अत्यावश्यक बाबी करण्यात येणार आहेत.

हा उपक्रम रत्नागिरीतील कै. ना. प. अभ्यंकर निरीक्षण बालगृहातील विद्यार्थ्यासाठी राबविण्यात आला. येथील सर्वच विद्यार्थ्यासाठी तो फलदायी ठरला.

उद्दिष्ट्यनिहाय फलनिष्पत्ती

उद्दिष्ट्ये -१

कोरोना कालावधीत बालसुधारगृहातील विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवून सकारात्मक मानसिकता तयार करणे.

फलनिष्पती:

१) Online शिक्षणामुळे विद्यार्थ्यामध्ये चैतन्य निर्माणझाले.

२) Online उपक्रमात विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले.

३) online आतंरक्रिया साधल्याने कोरोनाची विद्यार्थ्याच्या मनातील भीती कमी होण्यास मदत झाली.

४) शाळा बंद म्हणून कंटाळलेले विद्यार्थी आवडीने अभ्यास करू लागले.

५) विध्यार्थ्यांना विविध उपक्रमाची गोडी लागली.

उद्दिष्ट्ये -२

अध्ययन – अध्यापन आनंददायी करून विद्यार्थ्यांची शिकण्याची गोडी टिकवून ठेवणे.

फलनिष्पती:

१) online शिक्षणामध्ये विद्यार्थी मनापासून सहभागी झाले.

२) शाळा बंद असतानाही बालसुधारगृहात त्यांनी आनंदायी शिक्षणाचा अनुभव घेतला.

३) SCERT मार्फत राबविलेल्या सर्व उपक्रमात विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले.

४) Smart TV, मोबाईल, टॅब व विविध online /offline उपक्रमाच्या मदतीने विद्यार्थ्यांची अध्ययन अध्यापन प्रक्रिया आनंददायी झाली व विद्यार्थ्यांची शिकण्याची आवड निर्माण झाली.

उद्दिष्ट-३

विदयार्थ्यांना नवनवीन शै. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यास प्रवृत्त करणे.

फलनिष्यती

१) विद्यार्थी अध्ययनात वैयक्तिकरित्या Smart. TV , mobile, tab चा वापर करू लागले.

२) तंत्रज्ञानाच्या आधारे Group study करू लागले.

३) शिक्षकाशिवाय शै. तंत्रज्ञानाचा वापर करून अध्ययन करू लागले.

४) विद्यार्थी तंत्रस्नेही बनले.

५) विद्यार्थ्यांमध्ये offline सोबत Online शिक्षणाची आवड निर्माण झाली.

उद्दिष्ट -४

विध्यार्थ्यांच्या स्वयंअध्ययनास चालना देणे.

फलनिष्पती -

१) विद्यार्थी online/ offline शैक्षणिक उपक्रमामुळे स्वयंअध्ययन करू लागला.

२) विद्यार्थी स्वयंअध्ययनात येणाऱ्या अडचणी स्वतः सोडवू लागला.

३)विदयार्थ्यांना स्वयंअध्ययनाची आवड निर्माण झाली.

उद्दिष्ट-५

विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यास मदत करणे.

फलनिष्पती -

१) '**शाळा** बंदपणशिक्षणसुरू' हे विधान या उपक्रमामुळे यशस्वी ठरले.

२) Online /offine शैक्षणिक अनुभव / विविध उपक्रमयामुळे विध्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढली.

३) उपक्रम पश्चात अध्ययनस्तर निश्चितीमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रगतीत वाढ झाल्याचे दिसून आले.

४) विविध उपक्रमामुळे विदयार्थी व्यक्तिमत्त्व विकासास मदत झाली.

उद्दिष्ट-६

समाज आणि बालसुधारगृहातील विदयार्थी यांच्यामधील आंतरक्रिया वृद्धींगत करणे.

फलनिष्पती -

उपक्रमात सहभागी माझे जवळजवळ सर्व मित्र-मैत्रिणी, प्राथमिक शिक्षक म्हणून काम करतात. (मीही पूर्वाश्रमी प्राथमिक शिक्षक म्हणून काम केले आहे) डाएटमध्ये अधिव्याख्याता म्हणून काम करत असल्यापासून बालसुधारगृहातील विदयार्थ्यासाठी मी उपक्रम घेत आहे. त्यामुळे नवचैतन्य ग्रुपमधील काही शिक्षक माझ्यासोबत अशा मुलांसाठी आधीपासून काम करीत आहेत. या उपक्रमामुळे आणखी काही शिक्षक बालसुधारगृहाशी जोडले गेले. सरकारी योजनामार्फत त्यांना खाणे, कपडे, शैक्षणिक

साहित्यइ.बाबी पुरेशा मिळतात. ही मुले आई-बाबा, परिवाराशिवाय मोठी होत असतात. त्यांना फक्त गरज असते. प्रेमाची, मायेच्या स्पर्शाची, व आपलेपणाची हे सारे या उपक्रमात सहभागी झालेल्या सदस्यांना समजले.

१) नवचैतन्य ग्रुप व विद्यार्थी यांच्यमध्ये प्रेमाचे नाते निर्माण झाले.

२) उपक्रम पूर्ततेसाठी समाजाच्या काही इतर सदस्यांनी चांगल्या कार्यात आमचा खारीचा वाटा म्हणून हात भार लावला.

३) उपक्रमासाठी समाजाने आर्थिक मदत केली.

४) काहींनी आपला बहूमूल्य वेळ देवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

५) अशा विद्यार्थ्यांसाठी आपणही काही केले पाहिजे ही भावना सर्वांच्या मनात निर्माण झाली.

६) बालसुधारगृह व निरीक्षण गृहातील मुलांच्या वर्तन समस्या , अडचणी ग्रुपमधील सदस्यांना समजल्या.

<u>या बरोबर खालील फलनिष्पत्ती उपक्रमाचे यश अधोरेखित करतात -</u>

१) बालसुधारगृहातील शिक्षक श्री. विनोद पवार यांना अधीक्षक श्री. वायगणकर व स्टॉफ यांना कोरोना कालावधीत विद्यार्थी संबंधित समस्या / अडचणी सोडविण्यात हा उपक्रम सहाय्यभूत ठरला.

२) शिक्षक श्री. विनोद पवार यांच्यावरील अध्यापनाचा ताण खूप कमी झाला.

३) कोरोना कालावधीत विद्यार्थ्यांची काळजी घेणे, अध्ययन – अध्यापन करणे, बालसुधारगृहातील वातावरण (कोरोनाच्या भयावह परिस्थितीतही) आनंददायी ठेवण्यात उपक्रम उपयुक्त ठरला.

४) विद्यार्थी व शिक्षक यांची बदललेली भूमिका आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञान यांच्याविषयी जागृतता निर्माण झाली.

५) उपक्रमातील सहभागी सर्वच सदस्यांचे विद्यार्थ्यासोबत श्री. विनोद पवार (शिक्षक) याला अनमोल मार्गदर्शन मिळाले.

६) उपक्रमातील सहभागी नवचैतन्य ग्रुपमधील सदस्याच्या पाल्यांच्या मनातही या विद्यार्थ्याविषयी आपुलकी निर्माण झाली. त्यापैकी काहीनी सदर उपक्रमात आपल्या परीने सहकार्य केले.

## या उपक्रमाचा मला झालेला फायदा:

१) बालसुधारगृहातील विदयार्थ्यासाठी काम करण्यासाठी मला खूप जास्त मदत करणाऱ्या हातांची संख्या पटीने वाढली. त्यामुळे काम करताना उत्साह आला.

२)कोरोनाकालावधीत माझ्या कुटुंबासाठी खूप दु:खदायी होता. माझ्या धाकट्या भावाचे निधन, मी स्वत: कोरोनाग्रस्त, माझ्या आईचे कुटुंब कोरोनाग्रस्त, आम्ही रहातो ती बिल्डींग, तो पूर्ण परिसर कारोनाग्रस्त, रोज ऐकू येणाऱ्या नातेवाईक /परीचित व्यक्तीच्या मृत्यूच्या बातम्या या साऱ्यामुळे मी मानसिकरित्या खूप खचले होते. या सर्व नकारात्मक मानसिकतेतून बाहेर पडण्यास पुन्हा मला हा उपक्रम सहाय्यभूत ठरला. खंबीरपणे उभी राहून बालसुधारगृहातील मुलांसाठी मी काम करू लागले.

३)माझी दोन्ही मुलं श्रीनिधी व यशराज आधीपासून माझ्यासोबत या विदयार्थ्यासाठी विविध उपक्रमात मला मदत करतात.

४) मी माझ्या बालसुधारगृहातील सर्व मुले मला व माझ्या मुलांना आपलं मानतात. आम्ही गेल्यावर त्यांना आनंद होतो. रस्त्यात, शाळेत दिसली की प्रेमाने जवळ येऊन बोलतात. मी भेटल्याचा व बोलल्याचा आनंद त्यांच्याचेहऱ्यावरुन ओसंडताना दिसतो. हेच मी करत असलेल्या कामाचे फलित आहे असे मला वाटते.

## समारोप

हा उपक्रम अजून संपलेला नाही. समाजाच्या मदतीने या ही पुढे अविरत चालू रहाणार आहे. विविधउ पक्रमांचे आयोजन केले जाणार आहे.

या उपक्रमामुळे बालसुधारगृह व निरीक्षणगृहातील मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीस चालना मिळाली, त्यांच्या व्यक्तिमत्व विकास, पूरक उपक्रमांचे आयोजन

करण्यास यशस्वी झाले. कोरोनासंबंधीचे सर्व निर्बंध उठवल्यावर नवचैतन्य ग्रुपमधील शिक्षक, मी स्वतः प्रत्येकी एक मूल दत्तक घेऊन (each one - teach one पद्धतीने) शाळेच्या / ऑफिसच्या वेळेव्यतिरिक्त वेळ देऊन त्यांना अध्यापन करणार आहे.

कोरोना कालावधीत बालसुधारगृहातील विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ, शैक्षणिक प्रगती आनंददायी वातावरण समृद्ध करण्यात सदर उपक्रमाचा हातभार लागला याचा आम्हा सर्व नवचैतन्य ग्रुपमधील सदस्यांना मनस्वी आनंद आहे.

या नवोपक्रमातील विविध कृतींचे फोटो, नवचैतन्य ग्रूपमधील चॅटींग / मार्गदर्शन, उपक्रमातील सहभागी सदस्य व बालसुधारगृहातील शिक्षक श्री. विनोद पवार यांचे उपक्रमाबाबतचे अभिप्राय याबाबत अधिक माहितीसाठी खालील दुव्यांना क्लिक करावे.

https://photos.app.goo.gl/WMJSTgPj4zTZFBwM8

https://photos.app.goo.gl/L1Wvy4ogXoJo42df6

https://photos.app.goo.gl/2tBeHV19wt1JxnXV9

संदर्भ सूची

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आराखडा
२. निपुण भारत आराखडा
३. http://innovation.scertmaha.ac.in
4. https://youtube7BjMmcx1Hc

परिशिष्टे

| अ..क्र | नवचैतन्य ग्रुपमधील सदस्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री.सुशीलशिवलकर | व.अधिव्याख्याता डाएट रत्नागिरी |
| २ | श्रीम.दीपासावंत | अधिव्याख्याता डाएट रत्नागिरी |

| | | |
|---|---|---|
| ३ | श्री.रमेशकोरे | अधिव्याख्याता  डाएट रत्नागिरी |
| ४ | श्री. अभिमन्यूशिंदे | प्राथमिक शिक्षक |
| ५ | श्रीम.मानसी गावडे | निवृत्त  शिक्षिका |
| ६ | श्री,सुहास गुरव | प्राथमिक शिक्षक |
| ७ | श्रीम.ममता विचारे | प्राथमिक शिक्षिका |
| ८ | श्रीम.मानसी माने | प्राथमिक शिक्षिका |
| ९ | श्रीम. दिपाली जंगम | विषय साधन व्यक्ती रत्नागिरी |
| १० | श्रीम. अश्विनी काणे | विषय साधन व्यक्ती रत्नागिरी |
| ११ | श्रीम संगीता जाधव | प्राथमिक शिक्षिका |
| १२ | श्रीम. श्रद्धा गांगण | प्राथमिक शिक्षिका |
| १३ | श्री.चंद्रकांत झगडे | प्राथमिक शिक्षिका |
| १४ | श्रीम.मुगधा कुळये | प्राथमिक शिक्षिका |
| १५ | श्रीम. अनुप्रिता कोकजे | प्राथमिक शिक्षिका |
| १६ | श्रीम. नीलिमा जोशी | प्राथमिक शिक्षिका |
| १७ | श्रीम.तृप्ती साळवी | प्राथमिक शिक्षिका |
| १८ | श्रीम. संगीता धामापूरकर | प्राथमिक शिक्षिका |
| १९ | श्री. सुरेश  मंद्रूपकर | निवृत्त अध्यापाकाचार्य |
| २० | श्रीम. मैथिली लांजेकर | प्राथमिक शिक्षिका |
| २१ | श्रीम.नीता दामले | प्राथमिक शिक्षिका |
| २२ | श्रीम. वैशाली कुडाळकर | प्राथमिक शिक्षिका |

उपक्रमासाठीचे मदतीचे हात

| अ.क्र | देणगीदाराचे नाव | तपशील | किंमत |
|---|---|---|---|
| १ | नवचैतन्य ग्रुप | SMART T.V | २३००० |
| २ | नवचैतन्य ग्रुप | पेन ड्राईव्ह २ | १५०० |
| ३ | नवचैतन्य ग्रुप | चित्रकला साहित्य | ५०० |
| ४. | प्रसाद जोशी , महेश पवार पुणे | e -learning software | ४५००० |
| ५ | सचिन सारोळकर | tab | ३००० |
| एकूण | | | ७३००० |

निरिक्षण गृह - बालगृह रत्नागिरी
दहावीत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी

सन = 2020-21

1] यश पालकर - 50%.
2] सिद्धांत कदम - 53%.
3] नितीन बोरकर - 60%.
4] सुरेश गिरी - 72.60%.

# जिल्हा परिवीक्षा आणि अनुरक्षण संघटना संचलित

कै.ना.प.अभ्यंकर निरीक्षणगृह-बालगृह रत्नागिरी-डॉ.न.दा.पानवलकर बालगृह, रत्नागिरी
बोर्डीग रोड , जिल्हा उदयोग केंद्राशेजारी रत्नागिरी- ४१५६१२
दूरध्वनी ०२३५२- २२२१३७ ई मेल - observationratnagiri@gmail.com

| | | |
|---|---|---|
| मा.श्री.लक्ष्मीनारायण मिश्रा-भा.प्र.से. | श्री.सुधाकरराव सावंत | डॉ.संतोष बेडेकर |
| जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष | कार्याध्यक्ष | मानद सचिव |

जा.नं.निगृह/रत्ना/२०२०-२१/ दि.२०/०४/२०२०

*प्रति,*

श्रीमती दिपा सावंत
मा.अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ,रत्नागिरी

विषय – निरीक्षण गृह-बालगृह,रत्नागिरी प्रवेशित बालकांना स्मार्ट टिव्ही उपलब्ध करुन दिल्या बाबत...

महोदया,

आपण निरीक्षण गृह-बालगृह,रत्नागिरी संस्थेतील बालकांना वेळोवेळी मार्गदर्शन व मदत करीत असता विविध उपक्रम जसे गीत गायन कार्यक्रम,चित्रकला स्पर्धा,रांगोळी स्पर्धा ,तसेच मुलांना उपयुक्त अशा व्याख्यानांचे आयोजन केला आहात तसेच अप्रगत मुलांसाठी आपण विशेष उपक्रम देखील राबवीला होतात अशा विविध माध्यमातून आपण संस्थेतील बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न करीत असता

सध्या कोरोनाच्या वाढत्या प्रभावामुळे शाळेतील प्रत्यक्ष अध्यापन थांबले आहेत.संस्थेतील बालके ऑन लाईन पध्दतीने शिक्षण घेत आहेत.मात्र यासाठी आम्हाला स्मार्ट टि.व्ही.ची गरज होती.सदरची गरज लक्षात घेऊन आपण आपल्यास्तरावर तसेच नवचेतन्य ग्रुपच्या माध्यमातून पुढाकार घेऊन मुलांना टिव्ही उपलब्ध करुन दिलात या बददल ही संस्था आपली अत्यंत आभारी आहे.

आपली ही मदत आमच्या सस्थेत अत्यंत महत्वाची आहे.धन्यवाद...

आपला विश्वासू

अधिक्षक
निरीक्षण गृह - बालगृह
रत्नागिरी

# जिल्हा परिवीक्षा आणि अनुरक्षण संघटना संचलित

कै.ना.प.अभ्यंकर निरीक्षणगृह-बालगृह रत्नागिरी-डॉ.न.दा.पानवलकर बालगृह, रत्नागिरी
बोर्डींग रोड , जिल्हा उदयोग केंद्राशेजारी रत्नागिरी-४१५६१२
*दूरध्वनी ०२३५२- २२२१३७ ई मेल - observationratnagiri@gmail.com*

---

| | | |
|---|---|---|
| मा.श्री.डॉ.बी.एन.पाटील -भा.प्र.से.<br>जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष | श्री.सुधाकरराव सावंत<br>कार्याध्यक्ष | डॉ.संतोष बेडेकर<br>मानद सचिव |

---

जा.नं.निगृह/रत्ना/२०२१-२२/ दि.१९/०५/२०२१

*प्रति,*

श्रीमती दिपा सावंत
मा.अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ,रत्नागिरी.

कोरोनाच्या महामारीचा सर्वात मोठा फटका हा शिक्षण व्यवस्थेला बसला आहे.बालके जवळपास दोन वर्षे शाळांपासून दुरावली आहेत.याचा प्रतिकूल परिणाम बालकांवर होताना दिसतो.हया काळात शाळा बंद असल्याने आमच्या संस्थेतील बालके देखील पुर्णवेळ संस्थेतच असतात. मात्र आपण हया काळात मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी कार्यरत होतात.

आपण करोना काळात विविध उपक्रम मुलांसाठी राबवीलात यात ऑनलाईन पध्दतीने छ.संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारीत श्री.जाधव सर यांच्या व्याख्यानाचा समावेश होता. अप्रगत मुलांसाठी आपण विशेष उपक्रम देखील राबवीला होतात.रांगोळी स्पर्धा, ऑनलाईन मुलाखत,चित्रकला स्पर्धा,मुलांसोबत संवाद,दिक्षा ॲप मार्गदर्शन , तसेच इ.१ली ते ८वी मुलांसाठी आपण सॉफटवेअर उपलब्ध करुन दिलात.अशा विविध माध्यमातून आपण संस्थेतील बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न करीत असता .येणा-या काळात देखील आपण अशीच मदत आम्हाला कराल याची खाती वाटते.आपले व आपल्या सहकार्यांचे खुप खुप आभार.व शुभेच्छा...

अधिक्षक
निरीक्षण गृह - बालगृह
रत्नागिरी

# जिल्हा परिवीक्षा आणि अनुरक्षण संघटना संचलित


के.ना.प.अभ्यंकर निरीक्षणगृह-बालगृह रत्नागिरी-डॉ.न.दा.पानवलकर बालगृह, रत्नागिरी

बोर्डींग रोड , जिल्हा उदयोग केंद्राशेजारी रत्नागिरी-४१५६१२

*दूरध्वनी ०२३५२- २२२१३७ ई मेल - observationratnagiri@gmail.com*

| मा.श्री.लक्ष्मीनारायण मिश्रा-भा.प्र.से. | श्री.सुधाकरराव सावंत | डॉ.संतोष बेडेकर |
|---|---|---|
| जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष | कार्याध्यक्ष | मानद सचिव |


जा.नं.निगृह/रत्ना/२०२०-२१/ दि.१५/०५/२०२०

*प्रति,*

श्रीमती दिपा सावंत

मा.अधिव्याख्याता,

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ,रत्नागिरी

विषय – निरीक्षण गृह-बालगृह,रत्नागिरी प्रवेशित बालकांना ई-लर्निंग सॉफटवेअर उपलब्ध करुन दिल्या बाबत

महोदया,

आपण निरीक्षण गृह-बालगृह,रत्नागिरी संस्थेतील बालकांना वेळोवेळी मार्गदर्शन व मदत करीत असता विविध उपक्रम जसे गीत गायन कार्यक्रम,चित्रकला स्पर्धा,रांगोळी स्पर्धा ,तसेच मुलांना उपयुक्त अशा व्याख्यानांचे आयोजन केला आहात तसेच अप्रगत मुलांसाठी आपण विशेष उपक्रम देखील राबवीला होतात अशा विविध माध्यमातून आपण संस्थेतील बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न करीत असता

सध्या कोरोनाच्या वाढत्या प्रभावामुळे शाळेतील प्रत्यक्ष अध्यापन थांबले आहेत.संस्थेतील बालके ऑन लाईन पध्दतीने शिक्षण घेत आहेत.मात्र यासाठी आम्हाला स्मार्ट टि.व्ही.ची गरज होती.सदरची गरज लक्षात घेऊन आपण आपल्यास्तरावर तसेच नवचेतन्य ग्रुपच्या माध्यमातून पुढाकार घेऊन मुलांना टिव्ही उपलब्ध करुन दिलात हया टिव्हीचा परिणाम करक उपयोग होण्यासाठी इ.१ली ते ८वी साठी ई—लर्निंग सॉफटवेअर श्री.महेश पवार यांच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिलात या बददल ही संस्था आपली अत्यंत आभारी आहे.सदरच्या सॉफटवेअरमुळे बालकांच अध्ययन आणखी सुलभ व परिणामकारक झाले आहे.

आपली ही मदत आमच्या सस्थेत अत्यंत महत्वाची आहे.धन्यवाद...

आपला विश्वासू

अधिक्षक

निरीक्षण गृह - बालगृह

रत्नागिरी

# जिल्हा परिवीक्षा आणि अनुरक्षण संघटना संचलित

के.ना.प.अभ्यंकर निरीक्षणगृह-बालगृह रत्नागिरी-डॉ.न.दा.पानवलकर बालगृह, रत्नागिरी

बोर्डींग रोड , जिल्हा उदयोग केंद्राशेजारी रत्नागिरी-४१५६१२

दूरध्वनी ०२३५२- २२२९३७ ई मेल - observationratnagiri@gmail.com

| मा.श्री.लक्ष्मीनारायण मिश्रा-भा.प्र.से. | श्री.सुधाकरराव सावंत | डॉ.संतोष बेडेकर |
|---|---|---|
| जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष | कार्याध्यक्ष | मानद सचिव |


---

जा.नं.निगृह/रत्ना/२०२१-२२/१४७ दि.१७/०६/२०२१

प्रति,
मा.श्रीमती दिपा सावंत
अधिव्याख्याता
DIET रत्नागिरी

विषय- निरीक्षणगृह-बालगृहातील बालकांसाठी टॅब मिळणेबाबत...

महोदया,

उपरोक्त विषयानुसार सदयस्थितीत कोविड-१९ च्या वाढत्या प्रभावामुळे प्रशालेतील प्रत्यक्ष अध्यापन बंद असून ऑनलाईन पध्दतीने शालेय अध्यापन करण्यात येत आहे. गेल्या वर्षी आपण व आपले दानशूर सहकारी यांचक प्रयत्नाने आमच्या संस्थेस स्मार्ट टेलिव्हिजन उपलब्ध करून दिला होतात. त्याचप्रमाणे त्यात इ.१ ली ते ७ वी साठी लर्निंग सॉफटवेअर उपलब्ध करून दिलात. आमच्या संस्थेत आपण ऑनलाईन मुलाखत, ऑर्केस्टा, व्याख्याने स्पर्धा असे अनेक उपक्रम राबलिलेले आहात.संस्थेतील निराधार, निराश्रित मुलांना त्याचा खूप फायदा झालेला आहे.

सध्या आमच्या संस्थेत पहिली ते आय टी आय पर्यंतची मुले प्रविष्ट असून ती ऑनलाईन पध्दतीने प्रशालेतून होणाऱ्या अध्यापनात सहभागी होत आहेत. मात्रा संस्थेत केवळ कर्मचाऱ्यांचा एखादा मोबाईल उपलब्ध होतो व एकाच वर्गातील मुलांना त्यात सहभागी होता येते. इतर मुले यात सहभागी न झाल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. तरी आपणांस शक्य असल्यास किमान ३ ते ४ टॅब आपणाकडून व इतर दानशूर सहकाऱ्यांकडून उपलब्ध होऊ शकले तर संस्थेतील मुलांना मोठे सहकार्य होईल. आपण वेळोवेळी संस्थेला मदत करत आलेला आहात तरी यावेळी देखील शक्यती मदत करावी, हि विनंती.


| इयत्ता | मुलांची संख्या | इयत्ता | मुलांची संख्या | इयत्ता | मुलांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| २री | १ | ६वी | १ | १०वी | ७ |
| ३री | १ | ७वी | १ | ITI | ५ |
| ४थी | ४ | ८वी | १ | | |
| ५वी | ३ | ९वी | १ | एकूण | २५ |


आपला विश्वासू,
Bahameshwaranker
अधिक्षक १७/६/२०२१
निरीक्षण गृह - बालगृह
रत्नागिरी


संस्थेत तयार केलेला भाजीपाला




12:39 PM




★ 12:37 PM